**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००१**

विभागीय अध्यक्ष- ०२५३- २५९९९५४ विभागीय सचिव- ०२५३-२५००४६०
फॅक्स्- २५९९३५९ ईपीएबीएक्स- २५९२१४१ / २५९२१४२ / २५९२१४३
**Website- sscboardnashik.com** **Email ID-nsksec@rediffmail.com**

---

**महत्वाचे/तातडीचे**

**क्र. नाविमं/संकीर्ण (माध्य./उ.मा.)/२११४**
**नाशिक- ४२२ ००१**
**दिनांक - १७/१२/२०१५**

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार

**विषय - मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक कायम करणेबाबत...**
**संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र.नाविमं/संकीर्ण (माध्य.)/४९०/दि.१०/०६/२०१५**
**२. या कार्यालयाचे पत्र क्र.नाविमं/संकीर्ण (उच्च माध्य.)/४०९/दि.०२/०६/२०१५**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळा/कनिष्ठ महाविदयालयास प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक प्रदान केल्यानंतर मंडळ नियमावली १९७७ मधील २८ (१६) व ६६ (९) अन्वये सलग पाच वर्ष मंडळ मान्यता वर्धित करणे व सहाव्या वर्षी कायम मंडळ मान्यता घेणेबाबतचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्य.) व शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांची शिफारस घेवून मंडळ कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक/अनिवार्य होते. तथापि संदर्भिय पत्रान्वये आपणाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आपण आपल्या शाळा/कनिष्ठ महाविदयालयाची सलग पाच वर्ष मंडळ मान्यता वर्धित अथवा सहाव्या वर्षी कायम मंडळ मान्यता घेतलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या पत्रान्वये आपणास सूचित करण्यात येते की, सन २०१०-११ पूर्वी ज्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक घेतला असेल अशा शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांनी कायम मंडळ मान्यतेसाठी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्य.) व शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांची शिफारस घेवून मंडळ कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा अन्यथा फेब्रु/मार्च २०१६ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) देण्यात येणार नाही. तसेच आपल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयास देण्यात आलेला सांकेतिक क्रमांक व मंडळ मान्यता काढून घेण्याची कारवाई करण्यात येईल. त्यामुळे विदयार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आपणावर निश्चित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(आर.आर.मारवाडी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक -४२२ ००१

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
१. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४
२. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार